MAHARASHTRA EDUCATION SOCIETY'S
(SINCE 1860)
# M.E.S.NIGHT COLLEGE OF ARTS & COMMERCE
Affiliated by Savitribai Phule Pune University, Pune
Karve Road, Pune 411004, Maharashtra, India | Ph.: 020-241038268
E-mail:nightcollege@mespune.in, principal.nc@mespune.in | www.http://nigtcollege.mespune.in

**Dr. Sujata Adamuthe** (M.Phil,SET,Ph.D)
**Principal**

- AISHE CODE : C-45876
- PUN CODE : CAAP019770

- ID No. PU/PN/AC/446/2012
- NAAC Accredited 'B' Grade

दि. २५/०८/२०२६

## विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची सूचना

## शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी Central Sector Scholarship (CSSS) योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती नवीन अर्ज व नूतनीकरण (Renewal) अर्जाबाबत

महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, **सन २०२६-२७ साठी केंद्र शासन पुरस्कृत Central Sector Scholarship (CSSS) योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीचे नूतनीकरण (Renewal) करण्यासाठी ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे.**

### १. अर्ज करण्याची अंतिम मुदत

Central Sector Scholarship योजनेचा ऑनलाइन **Fresh & Renewal अर्ज करण्याची अंतिम मुदत** ३०/०९/२०२६ आहे. विद्यार्थ्यांनी अंतिम मुदतीपूर्वी अर्ज पूर्ण करून त्याची प्रत आवश्यक कागदपत्रांसह महाविद्यालयात सादर करावी.

### २. नूतनीकरणासाठी आवश्यक कागदपत्रे

विद्यार्थ्यांनी खालील कागदपत्रे तयार ठेवावीत :

1. मागील वर्षाची गुणपत्रिका.
2. चालू शैक्षणिक वर्षाचे **Bonafide Certificate.**
3. ऑनलाइन अर्जाची प्रत व अर्जासोबत आवश्यक असलेली इतर कागदपत्रे.

M.E.S. Night College of Arts & Commerce Pune-04.

## ३. ऑनलाइन अर्ज करण्याची कार्यपद्धती

1. पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी **National Scholarship Portal (NSP)** वर ऑनलाइन पद्धतीने Renewal अर्ज भरावा.

2. अर्ज करण्यासाठी आधार क्रमांकाचा वापर करावा.

3. शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी **One Time Registration (OTR)** व आवश्यक e-KYC प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

4. विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आधार क्रमांक त्यांच्या **बँक खात्याशी लिंक** केलेला असणे आवश्यक आहे.

5. विद्यार्थ्यांचे बँक खाते **Operative/Active** स्थितीत असावे, जेणेकरून शिष्यवृत्तीची रक्कम जमा होण्यास अडथळा येणार नाही.

6. बँक खाते विद्यार्थ्याच्या **स्वतःच्या नावावर** असावे. संयुक्त खाते, चुकीचा खाते क्रमांक किंवा इतर बँक तपशीलामुळे शिष्यवृत्ती मिळण्यास विलंब/अडचण झाल्यास संबंधित विद्यार्थी जबाबदार राहील.

7. ऑनलाइन अर्ज भरताना **National Scholarship Portal वरील SOP (Standard Operating Procedure)** काळजीपूर्वक वाचून त्यानुसार अर्ज भरावा.

8. अर्जामध्ये भरलेली सर्व माहिती अचूक व पूर्ण असल्याची खात्री करून अर्जाची प्रत आवश्यक कागदपत्रांसह महाविद्यालयात सादर करावी.

9. ऑनलाइन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयाशी संपर्क साधून अर्ज पूर्ण करून घ्यावा.

10. पात्र विद्यार्थ्याने नूतनीकरणासाठी अर्ज करणे राहून गेले असल्यास, पुढील वर्षी अर्ज करण्यास पात्र असण्याची शक्यता असली तरी मागील वर्षाचा लाभ मिळणार नाही.

11. एखाद्या पात्र विद्यार्थ्याने मागील वर्षी अर्ज केला नसल्यास, पुढील वर्षी त्याला योजनेचा अर्ज भरता येईल; मात्र ज्या वर्षाचा अर्ज प्रलंबित राहिला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही.

12. मागील वर्षी अर्ज पडताळणीसाठी प्रलंबित राहिला असल्यास, चालू वर्षी पुन्हा अर्ज करता येईल; मात्र मागील वर्षाचा लाभ मिळणार नाही.

13. नूतनीकरण करणाऱ्या विद्यार्थ्याने महाविद्यालय बदलले असल्यास, National Scholarship Portal वर आवश्यक ती **महाविद्यालय बदलाची प्रक्रिया** पूर्ण करून अर्ज करावा.

14. नूतनीकरणाचा अर्ज भरताना मागील वर्षाच्या शैक्षणिक कामगिरीसह आवश्यक पात्रता पूर्ण असणे गरजेचे आहे. योजनेनुसार विद्यार्थ्याने सर्व विषयांमध्ये उत्तीर्ण असणे आवश्यक असून **ATKT विद्यार्थी या योजनेसाठी पात्र नाहीत.**

15. विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील **किमान ७५% उपस्थिती** असणे आवश्यक आहे तसेच विद्यार्थ्यावर कोणताही गुन्हा दाखल नसावा.

M.E.S. Night College of Arts & Commerce ★ Pune-04.

४. विद्यार्थ्यांनी विशेष काळजी घ्यावी

- अर्जातील नाव, आधार क्रमांक, बँक खाते क्रमांक, IFSC, मोबाईल क्रमांक व इतर सर्व माहिती अचूक भरावी.
- आधार क्रमांक बँक खात्याशी लिंक आहे की नाही याची खात्री करावी.
- बँक खाते स्वतःच्या नावावर व Active/Operative स्थितीत असल्याची खात्री करावी.
- ऑनलाइन अर्जाची प्रत महाविद्यालयात आवश्यक कागदपत्रांसह वेळेत सादर करावी.
- अंतिम मुदतीनंतर अर्ज स्वीकारला जाणार नाही; त्यामुळे विद्यार्थ्यांनी शेवटच्या दिवसाची वाट न पाहता अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी.

५. अधिक माहितीसाठी

शिष्यवृत्तीबाबतच्या मार्गदर्शक सूचना (Guidelines), SOP व FAQs विद्यार्थ्यांनी National Scholarship Portal तसेच उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध सूचनांनुसार पाहाव्यात.

**National Scholarship Portal :** www.scholarships.gov.in
**उच्च शिक्षण संचालनालय :** www.dhepune.gov.in

**सर्व पात्र विद्यार्थ्यांनी वरील सूचनांचे पालन करून Central Sector Scholarship चा Fresh & Renewal अर्ज विहित मुदतीत पूर्ण करावा.**

M.E.S. Night College of Arts & Commerce ★ Pune-04.

28.8.26

प्राचार्य
Principal
M.E.S. Night College of Arts & Com
Karve Road, Pune-411 004.